# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### ग्रामपंचायत सदस्यांमधून सरपंचाची निवड करण्याचा शासनाने निर्णय घेतल्याबाबत

**(१) ६०९२ (१२-०४-२०२०). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जनतेतून थेट निवडणुकीद्वारे सरपंचाची निवड करण्याचा तत्कालीन शासनाचा निर्णय शासनाने रद्द केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ९ हजार ग्रामपंचायतींनी ग्रामसभेत राज्य सरकारच्या निर्णयाला विरोध करणारे ठराव पारित केले आहेत, तसेच राज्य सरपंच परिषदेनेही या निर्णयाला विरोध केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्णय रद्द केल्यामुळे सरपंच निवडीतील भ्रष्टाचाराला चालना मिळणार आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निर्णयाचा फेरविचार करुन तो मागे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, कार्यवाहची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. गिरीश महाजन (१०-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, सरपंच परिषदेची काही निवेदने शासनास प्राप्त झाली आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वसई तालुक्यातील (जि.पालघर) भालीवली-भाताणे-अडणे-भिनार-वडघर-निंबवली रस्त्याच्या दुरुस्तीबाबत

**(२) ३४१०५ (०७-०१-२०२२). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई तालुक्यातील (जि.पालघर) भालीवली-भाताणे-अडणे-भिनार-वडघर-निंबवली हा १६ कि.मी.चा पालघर जिल्ह्यातील वसई-वाडा तालुक्याला जोडणारा प्रधान मंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत असलेला महत्त्वाचा रस्ता मोठ्या प्रमाणात खराब झाल्याने त्याच्या दुरुस्तीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास शासनाला निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्हयातील ग्रामीण भागात नैसर्गिक आपत्तीच्या कारणांमुळे दुरावस्था झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत मंजूर झालेल्या निधीतून पावणेतीन कोटी रुपयांचा खर्च अस्तित्वात नसलेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी होणार असल्याचे निदर्शनास आले आहे माहे ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यादरम्यान काढलेल्या निविदेवर रोख लावण्याची मागणी जिल्हा परिषदेच्या सदस्यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी रस्ते दुरुस्ती व पुरहानी कार्यक्रम अंतर्गत निधी मिळावा असे वारंवार कळवूनही अद्यापपर्यंत निधी उपलब्ध झाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू रस्त्याची शासनाने पाहणी करुन रस्त्याच्या दुरुस्ती करिता पूरहानी अंतर्गत (FDR Programme) निधीस मंजूरी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. गिरीश महाजन (२२-०९-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे ही खरे आहे.
(३) व (४) हे खरे नाही.

मुख्य अभियंता (प्रमंग्रासयो), पुणे या कार्यालयाकडून पुरहानी कार्यक्रम २०२१-२२ अंतर्गत सदर रस्त्याच्या १.५० कि.मी. लांबीच्या दुरुस्तीकरिता रु.४२.१० लक्ष इतका निधी मंजूर झाला आहे. सदर प्राप्त निधीनुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकानुसार निविदा निश्चित करुन रस्त्याच्या दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात आले असून सद्यःस्थितीत सदरहू रस्त्यावरुन वाहतुक सुरळीतपणे सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्हयातील प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये चुकीच्या नोंदीमुळे लाभार्थी अपात्र ठरत असल्याबाबत

**(३) ३४८३६ (०६-०१-२०२२). श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्हयातील प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत (ग्रामीण) भागातील लाभार्थ्यांच्या नावासमोर चुकीची माहिती सादर केल्यामुळे मोठया प्रमाणात पात्र लाभार्थी चुकीच्या माहितीमुळे अपात्र ठरत असल्याची गंभीर बाब माहे ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन पात्र लाभार्थी असताना चुकीची माहितीमुळे अपात्र ठरविणाऱ्या, चुकीची माहिती सादर करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२७-०९-२०२३) :** (१) व (२) सदर प्रकरणी चौकशी केली असता, अशी कोणतीही बाब आढळून आली नाही. तथापि प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत प्रपत्र "ड" बाबत आवास प्लस सर्वेक्षण करतांना लाभार्थ्यांनी सर्वेक्षणा दरम्यान दिलेल्या माहितीची नोंद आवास ॲप मध्ये करण्यात आली होती. अकोला जिल्हयामध्ये ९३,१५० एवढया लाभार्थ्यांचे सर्वे करुन लाभार्थ्यांनी दिलेल्या माहितीनूसार आवास प्लस ॲपमध्ये नोंदणी करण्यात आली होती. त्यापैकी २१,५०१ लाभार्थी आवास प्लस प्रणालीद्वारे System Auto Rejected झालेले आहेत.

राज्यातील प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण अंतर्गत प्रपत्र "ड" मधील तांत्रिक कारणाने अपात्र ठरलेल्या लाभार्थ्यांपैकी पात्र असलेल्या लाभार्थ्यांच्या नोंदी पुन्हा करण्याकरिता लिंक उपलब्ध करुन देण्यासाठीचा सविस्तर प्रस्ताव केंद्र शासनाकडे दि.१८/०५/२०२१ च्या पत्रांन्वये पाठविण्यात आला असता, केंद्र शासनाने दि.२०/०५/२०२१ च्या पत्रान्वये सदरचा प्रस्ताव अमान्य केला असून, पात्र लाभार्थ्यांना राज्य योजनेतून लाभ देण्याच्या सुचना केल्या आहेत.

तद्नंतर मा.लोकप्रतिनिधी कडून प्राप्त विनंती पत्राच्या अनुषंगाने लिंक उपलब्ध करुन देण्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव केंद्र शासनास दि.१४.०१.२०२२ च्या पत्रान्वये पुन्हा पाठविण्यात आला आहे. अद्यापपर्यंत कोणत्याही सूचना केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाकडून प्राप्त नाहीत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयातील जिल्हा परिषदेतील विविध विभागांमध्ये खातेप्रमुखांचे पद रिक्त असल्याबाबत**

**(४) ३५०९५ (०७-०१-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील जिल्हा परिषदेतील विविध विभागांमध्ये खातेप्रमुखांचे पद रिक्त असल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी १४ खात्यांपैकी १० खातेप्रमुखच नसल्याने जिल्हा परिषदेला अधिकारी कोण असा प्रश्न सर्वसामान्यांमध्ये निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त परिस्थितीमध्ये प्रभारी म्हणून भार चालवला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी खातेप्रमुखांचे रिक्त पद तात्काळ भरण्याबाबत तसचे सर्वसामान्यांची गैरसाय होवू नये यासाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०४-१०-२०२३) :** (१),(२) व (३) जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत महाराष्ट्र विकास सेवा गट "अ" संवर्गातील मंजूर १४ पदांपैकी ४ पदे व गट "ब" संवर्गातील मंजूर १२ पदांपैकी ६ पदे रिक्त असल्याने सदर रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आलेला होता.

(४) सद्यस्थितीत महाराष्ट्र विकास सेवा गट "अ" संवर्गातील एकूण १४ मंजूर पदांपैकी १२ पदे भरण्यात आली असून गट "ब" संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंचायत समिती, रावेर (जि.जळगांव) च्या सन २०१५ ते २०२२ पर्यंतच्या कामकाजाची चौकशी करण्याबाबत**

**(५) ४६०७२ (०९-१०-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती, रावेर (जि.जळगांव) च्या सन २०१५ ते २०२२ पर्यंतच्या कारभाराबाबत सखोल चौकशी करुन दोषींवर योग्य ती कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १९.५.२०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय यांच्याकडे देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (११-१०-२०२३) :** (१) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पाठविलेले निवदेनाबाबत प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांचेकडे चौकशी केली. त्या कार्यालयांनी सदर निवेदनाचा शोध घेतला असता ते त्यांचेकडे प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही, असे कळविले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाच्या जाचक अटींमुळे ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांना घरकुल योजनेसाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याबाबत**

**(६) ४७८९१ (१०-११-२०२२). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या जाचक अटींमुळे ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांना घरकुल योजनेसाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी घरकुल करिता “ड” यादीत नाव आल्यानंतरही शासनाकडून लादलेल्या जाचक यादीमुळे सर्वसामान्य नागरिकांना होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सर्वसामान्य नागरिकांचा त्रास लक्षात घेता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०३-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सर्व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता केंद्र व शासन पुरस्कृत घरकुल योजनेत तुंटपुंज्या मानधनावर काम करीत असल्याबाबत

**(७) ४९५२१ (२९-०१-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता केंद्र व शासन पुरस्कृत विविध ग्रामीण घरकुल योजनेत गृहनिर्माण अभियंता म्हणून सन २०१६ पासून वा त्यादरम्यान कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हे गृहनिर्माण अभियंता बाराही महिने खेडे-पाडे-तांडे या डोंगराळ भागात जाऊन काम करीत असतांना त्यांना प्रति घरकुल रुपये ७५० एवढया तुंटपुंज्या मानधनावर काम करीत आहेत असे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू अभियंत्यांनी मानधनात वाढ करण्याबाबत शासनाकडे त्यांच्या संघटनेमार्फत पत्रव्यवहार करुनसुध्दा त्यांच्या मानधनात अद्यापही वाढ करण्यांत आलेली नाही हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व त्यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यांत येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१२-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) ग्रामविकास विभागाच्या दि.१२.११.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये, ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांच्या मानधनात वाढ करण्यात आली आहे. त्यानुसार, डोंगराळ,दुर्गम व नक्षलग्रस्त भागासाठी एकूण रु.१,२००/- प्रति घरकुल तसेच इतर सर्वसाधारण भागासाठी रु.९५०/- प्रति घरकुल एवढी मानधनात वाढ करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या प्रत्येक शाळेत किमान एक महिला शिक्षिकेची नेमणूक करणेबाबत

**(८) ५०१८९ (१९-०१-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या प्रत्येक शाळेत किमान एक महिला शिक्षिका असणे आवश्यक असतांनाही बहुतांश शाळांमध्ये महिला शिक्षिका कार्यरत नसल्याचे माहे, सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू शाळांमध्ये महिला शिक्षिका नसल्याने शाळेतील मुलींना आपल्या समस्या सोडविण्यास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने उक्त शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या समस्या जाणून घेण्यासाठी प्रत्येक शाळेत एकतरी महिला शिक्षिकाची नेमणूक करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील शिक्षक घरवापसीच्या प्रतीक्षेत असल्याबाबत**

**(९) ५२६०७ (२१-०१-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गत दोन वर्षापासून प्रलंबित असलेली शिक्षकांची अंतरजिल्हा बदलीला शासनाने सुरुवात केलेली असतांनाही काही जिल्हयातील १२२ शिक्षकांचे बदलीचे आदेश माहे ऑक्टोबर,२०२२ निर्गमित झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती जिल्हयात बदली झालेल्या १२२ शिक्षकांपैकी ७८ शिक्षक रुजू झाले असून ४४ शिक्षक अद्यापही इतर जिल्हयातून कार्यमुक्त न झाल्याने रुजू होण्याच्या प्रतिक्षेत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सदर ४४ शिक्षकांना कार्यमुक्त करुन अमरावती जिल्हयात रुजू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) ग्रामविकास विभागाचे दि.०२.१२.२०२२ रोजीचे शासन निर्णय व दि.२७.०२.२०२३ रोजीचे शुद्धीपत्रकान्वये सन २०१७ ते सन २०२२ या कालावधीमध्ये संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन पद्धतीने आंतरजिल्हा बदली झालेल्या व अद्याप मूळ जिल्हा परिषदेने कार्यमुक्त न केलेल्या शिक्षकांना कार्यमुक्त करणेबाबत सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती व कोरपना तालुक्यामध्ये सन २०१२ ते २०१५ या आर्थिक वर्षात इंदिरा आवास योजनेच्या घरकुलाची बांधकामे प्रलंबित असल्याबाबत**

**(१०) ५३०१० (२०-०१-२०२३). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती व कोरपना तालुक्यामध्ये सन २०१२ ते २०१५ या आर्थिक वर्षात इंदिरा आवास योजनेच्या घरकुलाची बांधकामे प्रलंबित असल्याच्या अनेक तक्रारी स्थानिक प्रशासनास प्राप्त झालेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बांधकाम पूर्ण न करता निधी खर्च झाल्याचे दाखवून निधीचा गैरवापर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने सदर प्रकरणी गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करुन प्रलंबित घरकुलाचे बांधकामे पूर्ण करणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२७-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वाबळेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक यांच्यावर चुकीच्या पद्धतीने झालेल्या कारवाईबाबत

**(११) ५३०२९ (२०-०१-२०२३). श्री.राजकुमार पटेल (मेळघाट) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाबळेवाडी (ता.शिरुर, जि.पुणे) येथील जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापक दत्तात्रेय वारे गुरुजी यांचे विरुध्द कोणत्याही प्रकारच्या तक्रारीचा अर्ज तसेच कोणत्याही आर्थिक व्यवहारांमध्ये त्यांचा संबंध नसतांना त्यांची शालेय कामकाज व वैयक्तिक चौकशी करुन त्यांचेवर थेट निलंबनाची कारवाई केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाबळेवाडी शाळेच्या आर्थिक लोकसहभागाची चौकशी करण्यासाठी ज्या ग्रामस्थांनी लोकसहभाग घेतला त्या ग्रामस्थांकडे कुठल्याही कागदपत्रांची मागणी केली गेली नाही आणि जिल्हा परिषदेने नेमलेल्या चौकशी समितीने ग्रामस्थांशी चौकशी काळात संपर्क केला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाबळेवाडी शाळेला पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचे नाव दिल्याच्या रागामुळे दत्तात्रय वारे गुरुजी यांच्यावर निलंबनाच्या कारवाईमुळे सन २०२१-२२ या शैक्षणीक वार्षात शाळा व अंगणवाड्यांमधील २१२ विद्यार्थी शाळा सोडून गेले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, निलंबनाच्या चौकशीच्या अंतिम अहवालात श्री. दत्तात्रय वारे यांनी विद्यार्थ्यांकडून बेकायदेशीरपणे देणगी अथवा वर्गणी घेतल्याचा अथवा शालेय कामकाजात आर्थिक गैरव्यवहार केल्याचा दोषारोप निश्चित केला गेला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच खोटी तक्रार देणाऱ्या संबंधितांवर कारवाई करुन दत्तात्रय वारे गुरुजींना न्याय देण्याबात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) हे खरे नाही.
(५) श्री.वारे यांचे प्रशासकीय कारणास्तव केलेले निलंबन दि.१०.०२.२०२२ रोजी संपुष्टात आणून जिल्हा परिषद शाळेवर उपशिक्षक या पदावर पुनर्स्थापित केलेले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पालघर जिल्हा परिषद शिक्षण विभाग विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवत असल्याबाबत

**(१२) ५३३२४ (२०-०१-२०२३). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हा परिषद शिक्षण विभाग विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवून त्यांना मोलमजुरी करण्यासाठी पाठवत असल्याचा आरोप जिल्हा परिषद सदस्य यांनी माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू जिल्ह्यात सधन व्यक्तीच्या मुलांना शाळेत प्रवेश मिळत असतांना गरिबांच्या मुलांना प्रवेश मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) याबाबत जिल्हा परिषद, पालघर यांच्या दि.०९.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सर्व गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला व जिल्हा परिषद, पालघर यांच्या दि.२८.११.२०२२ रोजीच्या पत्रानुसार इयत्ता ९ वी तील प्रवेशापासून वंचित असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना तात्काळ शाळेत दाखल करण्याबाबत कळविण्यात आले. सर्व गटशिक्षणाधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालानुसार इयत्ता ९वी मधील ५०७ विद्यार्थ्यांना शाळेत दाखल करण्यात आले आहे. उर्वरित ९५ विद्यार्थी परराज्यात स्थलांतरित झाले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुसेगाव (ता. सेनगाव, जि.हिंगोली) येथील जिल्हा परिषद प्राथमिक उर्दू शाळेमध्ये शिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत

**(१३) ५३३६७ (२०-०१-२०२३). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुसेगाव (ता. सेनगाव, जि.हिंगोली) येथील जिल्हा परिषद प्राथमिक उर्दू शाळेमध्ये पहिली ते सातवीच्या वर्गापर्यंत केवळ चार शिक्षक कार्यरत असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू शाळांमध्ये शेकडो विद्यार्थी शिक्षण घेत असताना मंजूर शिक्षकाची पदे रिक्त असल्याने विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर मोठा परिणाम होत असल्याने शाळा व्यवस्थापन समितीने शिक्षणाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अनेक वेळा निवेदन देऊनही पुरेशी शिक्षक न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तदनुषंगाने रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) पुसेगाव ता. सेनगाव जि. हिंगोली जिल्हा परिषद प्राथमिक उर्दू शाळा पहिली ते सातवी एकूण विद्यार्थी संख्या २१३ आहे. सन २०२२ - २३ च्या संच मान्यतेनुसार पुसेगाव उर्दु शाळेत ०१ मुख्याध्यापक, ०२ पदवीधर शिक्षक, ०५ प्राथमिक शिक्षक असे एकूण ०८ पदे मंजूर असून त्यापैकी ०५ प्राथमिक शिक्षक कार्यरत आहे. ०१ मुख्याध्यापकाचे रिक्त पद पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे. ०२ पदवीधर शिक्षकांची पदे रिक्त असून ०१ प्राथमिक शिक्षकाची तात्पुरती व्यवस्था करण्यात आली असून पदवीधर शिक्षकाचे २ पदे पवित्र पोर्टलमार्फत भरण्यात येणार आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पिंपरी खुर्द (ता.कळमनुरी,जि.हिंगोली) येथील कयाधू नदीच्या नाल्यावर असलेल्या पुलाची उंची वाढविण्याबाबत

**(१४) ५३९६५ (१८-०१-२०२३). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी खुर्द (ता.कळमनुरी,जि.हिंगोली) येथे जाण्यासाठी कयाधू नदीच्या नाल्यावर असलेल्या पुलाची उंची वाढविण्यात यावी अशी मागणी परिसरातील नागरीकांकडून वारंवार संबंधित विभागाकडे करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पूलाची उंची कमी असल्याने पूरावरुन सातत्याने पाणी, चिखलातून ग्रामस्थांना जावे लागत असून

माहे जुलै, २०२२ मध्ये चिखलामुळे एका रुग्णाला उपचारासाठी रुग्णालयात नेण्यास विलंब झाल्यामुळे त्याचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पिंपरी खुर्द येथील कयाधू नदीच्या नाल्यावरील पुलाची उंची तात्काळ वाढविण्याच्या अनुषंगाने शासनाने काय निर्णयात्मक कार्यवाही केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (११-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

पावसाळ्यात पूर परिस्थिती दरम्यान ग्रामस्थांना चिखलातून जावे लागते. तथापि माहे जुलै, २०२२ मध्ये रुग्णाचा मृत्यु झाल्याची नोंद संबंधित पोलीस ठाणे यांचेकडे नाही.

(३) कळमनुरी तालुक्यातील प्रामा-७ वर जोड रस्ता पिंपरी खु. कान्हेगाव चिखली या ग्रामीण मार्ग क्र.४६ च्या सा.क्र.१/०० ते १/२०० मध्ये कयाधु नदीला जोडणाऱ्या ओढ्यावर कमी उंचीचा व्हेंटेड कॉजवे अस्तित्वात आहे. सदर पूलाची उंची कमी असल्यामुळे पावसाळ्यात पूर आल्यावर पूलावरील वाहतूक तात्पुरती बंद होते. यास्तव जिल्हा परिषदेमार्फत सदर ठिकाणी पुलाचे बांधकाम सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात प्रस्तावित करुन निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केज (जि. बीड) तालुक्यातील जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, कार्यालय कायमस्वरूपी होणेबाबत व पदांसह मंजूरी देणेबाबत**

**(१५) ५४१४४ (२१-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि. बीड) तालुक्यातील जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, कार्यालयाची तात्पुरती (अंतर्गत) व्यवस्था केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केज तालुका हा भौगोलिक दृष्ठया मोठा असून उक्त तालुक्यात ११४ च्या वर ग्रामपंचायती आहेत. त्यामुळे सदर ठिकाणी कार्यालय कायमस्वरूपी करण्यासाठी पदांसह मंजूरी देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ग्रामविकास मंत्री यांच्याकडे दिनांक १३/१०/२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने उक्त कार्यालय कायमस्वरूपी होणेबाबत व पदांसह मंजूरी देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१०-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे. सदर निवेदन शासनाच्या विचाराधिन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ देण्याबाबत**

**(१६) ५६५०१ (१२-०६-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केंद्र पुरस्कृत इंदिरा आवास योजना सन १९९८ पासून ते २०१५ पर्यंत अस्तित्वात असून सदरहू योजनेचे प्रधानमंत्री आवास योजना या ग्रामीण योजनेमध्ये रुपांतर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य पुरस्कृत योजना असलेल्या रमाई आवास, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना व इतर आवास योजनेअंतर्गत यापुर्वी पात्र झालेल्या लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत लाभ देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त योजनेचा ज्या लाभार्थ्यांनी १० ते १५ वर्षापूर्वी लाभ घेतला परंतू सध्या त्यांचे घर राहण्यायोग्य नसल्याने सदर लाभार्थीचे अर्ज प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये पात्र करुन घेण्यात येत नसल्याने लाभार्थी प्रधानमंत्री आवास योजने पासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्‌अनुषंगाने उक्त लाभार्थ्यांची निवड करताना त्यांचा स्थळपाहणी अहवाल बांधकाम विभागाचे अभियंता व विस्तार अधिकारी यांचेमार्फत करुन सदरहू लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२७-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच इतर राज्य पुरस्कृत आवास योजना या प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या धर्तीवर व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनूसार राबविण्यात येतात. इंदिरा आवास योजनेंतर्गत लाभ घेतलेल्या परंतू आता ते घर राहण्यायोग्य नसलेल्या लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत कायमस्वरुपी प्रतिक्षा यादीमध्ये समाविष्ट करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे दि. १४ जानेवारी, २०२२ व दि. ०६ जुलै, २०२३ च्या पत्रान्वये सादर केला आहे. सदर बाब केंद्रशासनाकडे प्रलंबित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे जिल्ह्यासाठी वाढीव घरकुलांना मंजुरी देण्याबाबत

**(१७) ५६८३६ (२४-०४-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्ह्यासाठी पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घरकुल मंजुरीचे उद्दिष्ट निश्चित असतानाही १ हजार २२४ घरकुलांना मंजुरी मिळाली नसल्याने ते अन्य राज्यामध्ये वर्ग करण्यात येणार असल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदअनुषंगाने उक्त जिल्ह्यासाठी वाढीव घरकुलांना मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०३-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.
धुळे जिल्ह्यास सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत आवास प्लस ड यादीनुसार १८२७४ घरकुलांचे उद्दिष्ट प्राप्त झाले होते. त्यापैकी आजअखेर १८२७४ घरकुलांना मंजुरी देण्यात आलेली आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिद्धनकेरी (ता. मंगळवेढा, जि.सोलापूर ) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पूर्ण दिवस कुलुपबंद असल्याबाबत

**(१८) ५७१७४ (२४-०४-२०२३). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिद्धनकेरी (ता. मंगळवेढा, जि.सोलापूर ) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पूर्ण दिवस बंद असल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेत केवळ दोनच शिक्षक कार्यरत असून त्यापैकी एक शिक्षक आरोग्याच्या अडचणीमुळे बऱ्याच दिवसांपासून कामावर गैरहजर असून दुसरे शिक्षक वरिष्ठांना कल्पना न देता परस्पर गैरहजर राहत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत येथील पालकांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करूनही अद्याप कोणतीही चौकशी केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे, अंशत: खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयातील शिक्षकांच्या बदल्या तसेच रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्याबाबत**

**(१९) ५७५८३ (२४-०४-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०१७ ते २०२२ या कालावधीमधील ऑनलाईन पध्दतीने बदली झालेल्या शिक्षकांना कार्यमुक्त करण्याचे आदेश शासनाने दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आदेशाच्या अनुषंगाने रत्नागिरी जिल्ह्यातील ७०७ शिक्षक अन्य जिल्ह्यात बदलीने जाणार असल्याने आणि यापूर्वीच जिल्ह्यातील १५ टक्के शिक्षकांची पदे रिक्त असल्यामुळे जिल्ह्यातील शिक्षणाचा दर्जा कमी होऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्ह्यातील शिक्षणाचा दर्जा कमी होऊ नये व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही यासाठी शासनाने कोणती पर्यायी उपाययोजना केली तसेच शिक्षकांची रिक्त असलेली पदे तातडीने भरण्याच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) रत्नागिरी जिल्ह्यातील शिक्षकांच्या रिक्त पदावर मानधन तत्वावर १२ सेवानिवृत्त शिक्षकांना प्रथम नियुक्ती देण्यात आली आहे. सेवानिवृत्त शिक्षक अत्यल्प प्रमाणात उपलब्ध झाल्याने उर्वरित रिक्त पदांवर ६८८ स्थानिक बी.एड., डी.एड., पदवीधारकांना तासिका तत्वावर नियुक्ती देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तिवसा (जि.अमरावती) तालूक्यातील टाकळी जहाँगीर ते रामगांव व टाकळी जहाँगीर ते खानापूर रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(२०) ५७८८८ (०३-०५-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील टाकळी जहांगीर येथील काँक्रीट रस्त्याचे दोन्ही बाजूने जागा सुटलेली असून मुख्य चौक या ठिकाणी काँक्रिटीकरण व रुंदीकरण तातडीने करण्यात यावे, यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.

कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, अमरावती यांना दिनांक २ डिसेंबर, २०२२ रोजी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, टाकळी जहाँगीर (ता.तिवसा) येथील शेतकऱ्यांना वाहिवाटीचेदृष्टीने पांधण रस्ता करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास तहसिलदार अमरावती व संबंधित विभागाकडे निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, टाकळी जहाँगीर ते रामगांव व टाकळी जहाँगीर ते खानापूर रस्त्याचे काम पूर्ण करण्यासाठी तातडीने निधी उपलब्ध करण्याबाबत शासनस्तरावरुन काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करुन रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१६-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

सदरील रस्ता हा प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, टप्पा-३ अंतर्गत सन २०२१-२२ मध्ये मंजूर झाला असून सदर रस्त्याचे काम प्रगतीत आहे.
(२) अशा आशयाचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे निवेदन कार्यकारी अभियंता (प्रमंग्रासयो), महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, अमरावती, तसेच जिल्हा परिषद, अमरावती यांना प्राप्त झालेले नाही.
(३) व (४) टाकळी जहाँगीर ते रामगांव या रस्त्यास कोणताही दर्जा नसल्यामुळे काम करणे शक्य नाही. तसेच, टाकळी जहाँगीर ते खानापूर हा रस्ता ग्रामीण मार्ग २७ असून मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-२ अंतर्गत कोअर नेटवर्कमध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे. तालुक्यातील एकूण रस्त्याच्या गुणांकन पध्दतीने रस्त्याची यावर्षीची निकड पूर्ण झाल्यामुळे भविष्यातील रस्त्याच्या गुणांकन पध्दतीने सदर रस्ता प्रस्तावित करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्हातील घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू तसेच अनुदानात वाढ करणेबाबत

**(२१) ५८६३३ (०२-०५-२०२३). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंतप्रधान आवास योजनेतून घरकुल बांधण्यासाठी घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास मोफत वाळू देण्याची शासनाची योजना असताना सुध्दा लाभार्थ्यांना मोफत वाळू मिळत नसल्याबाबत सोलापूर जिल्हयातील लाभार्थ्यांनी प्रशासनाकडे दिनांक ६ जानेवारी, २०२३ रोजी तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू घरकुल योजनेसाठी शासन लाभार्थ्यांना १ लाख २० हजार रुपयांचे अनुदान देत असून मोफत वाळू मिळत नसल्यामुळे लाभार्थ्यांना वाळू खरेदीसाठी सुमारे ४० हजार रुपये खर्च करावा लागत असल्याने अनुदानात वाढ करण्यात यावी अशी मागणी लाभार्थ्यांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त लाभार्थ्यांना मोफत वाळू मिळणेबाबत तसेच अनुदानात वाढ करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२७-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) मोफत वाळू मिळणे या लाभार्थ्यांच्या मागणीच्या अनुषंगाने जिल्हास्तरावरुन तहसिलदार, माळशिरस यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

प्रधानमंत्री आवास योजना ही केंद्र शासनाची योजना असल्यामूळे सदर योजनेअंतर्गत लाभार्थ्यांच्या अनुज्ञेय अनुदानात रु.२.५० लक्ष वाढ करण्याबाबत ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे दिनांक २५.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर केला असता केंद्र शासनाने दिनांक ०२.१२.२०२० रोजीच्या पत्रान्वये अशी कुठलीही वाढ करता येत नाही, असे कळविले आहे. तद्नंतरही दि.०१.०८.२०२२ रोजी पुन्हा केंद्र शासनाकडे अनुदान वाढीची मागणी केली आहे. यासंदर्भात केंद्र शासनाकडून अद्याप प्रतिसाद प्राप्त झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा परिषद आरोग्य सेविका यांच्या प्रलंबित मागण्याबाबत

**(२२) ५९०७२ (११-०५-२०२३). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आरोग्य सेविका, जिल्हा परिषद यांच्या प्रलंबित मागण्या आरोग्य विभागाकडून मंजूर करण्याबाबत कर्मचारी संटनेच्या प्रमुख आरोग्य सेविका पुष्पा वानखडे, चंदा बेलसरे यांच्यासह अधिक दहा जणांच्या स्वाक्षरीचे निवेदन मा.आरोग्य मंत्री व मुख्य सचिव यांना दिनांक २८ डिसेंबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास प्राप्त झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदन मुख्य सचिव यांनी प्रधान सचिव,आरोग्य विभाग यांना पाठविले तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांनी त्याचे कार्यालयाचे पत्र क्रमांक गृह विभाग २७ कावि. ३६/ २०२३ दिनांक ११/१/२०२३ रोजी मा.आरोग्य मंत्री यांना वरील मागण्या मंजूर करण्याबाबत पत्र पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आरोग्य विभागाने या संबंधी निर्णय घेतला आहे काय, असल्यास त्याचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१०-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदर निवेदनातील मागण्याबाबतची वस्तुस्थिती पुढील प्रमाणे :-
१. कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबतची बाब धोरणात्मक स्वरुपाची आहे.
२. महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा ( सेवा प्रवेश ) नियम,१९६७ नुसार आरोग्य सेवकांचे सेवा प्रवेश नियम निश्चीत करण्यात आले आहेत.
३. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रातील लोकसंख्येनुसार एल.एच. व्ही. ची पदे भरण्यात येतात.
४. आरोग्य सेविका यांचा प्रवासभत्ता वाढविण्याची बाब धोरणात्मक स्वरुपाची आहे.
५. आरोग्य सेविका यांची सेवा अत्यावश्यक सेवेत गणली जात असल्यामुळे ०५ दिवसाचा आठवडा मंजूर करणे उचित होणार नाही.
६. आरोग्य सेविकांना प्रोत्साहनपर दोन वेतनवाढ देण्याबाबत सद्य:स्थितीत धोरण नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामीण भागात कंत्राटी आरोग्य सेविकांची सेवा खंडित न करता त्यांचे समायोजन करण्याबाबत

**(२३) ५९५२७ (०३-०५-२०२३). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रात काम करणाऱ्या ५९७ कंत्राटी आरोग्यसेविकांची सेवा समाप्त करण्याचा शासनाने निर्णय घेतला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचारी बेरोजगार होवून त्यांच्या उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त प्रकरणी कर्मचाऱ्यांना बेरोजगार न करता त्यांचे जिल्हयातील इतर पदांवर समायोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१०-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.

सन २०२२ - २०२३ च्या प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यामध्ये मंजूरी न मिळालेल्या ५९७ ए.एन.एम. पदांच्या सेवा समाप्त करण्याबाबत सहसंचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्या दि.१८.१०.२०२२ च्या पत्रान्वये सर्व जिल्हा परिषदांना कळविण्यात आले होते.
(२) व (३) आयुक्त, आरोग्य सेवा व संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांच्या दि.२९.११.२०२२ च्या पत्रान्वये उपरोक्त ५९७ ए.एन.एम. पदांचे समायोजन करण्याबाबत तसेच दि. २०.०१.२०२३ च्या पत्रान्वये सदर ५९७ ए.एन.एम. पदांना केंद्र शासनाकडून मंजूरी मिळाल्याने त्यांना रुजू करुन घेण्यात आले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मोखावणे-कसारा (ता.शहापूर, जि. ठाणे) ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात मंजूर झालेल्या प्रधानमंत्री आवास योजनेत वन विभागाच्या जागेचा अडथळा दूर करण्याबाबत

**(२४) ५९५४९ (०३-०५-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोखावणे-कसारा (ता.शहापूर, जि. ठाणे) ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात मंजूर झालेल्या प्रधानमंत्री आवास योजनेत वन विभागाच्या जागेचा अडथळा निर्माण झाल्याने लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेपासून वंचित राहावे लागल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रधानमंत्री आवास योजनेतील कसारा बुद्रुक गावातील जागेवर वन विभागाचा ताबा असूनही मागील वर्षांत सदर ठिकाणी ६० ते ७० वर्षापासून वहिवाट करत असणाऱ्या नागरिकांना इंदिरा गांधी आवास योजना तसेच लक्षांकानुसार शबरी, रमाई योजनेतून अनेक पात्र लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ मिळालेला असतांनाही मागील दोन वर्षांपासून प्रधानमंत्री आवास योजनेतून मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना घरकूल योजनेतून घर बांधण्यास वन विभागाच्या जागेचा अडथळा निर्माण होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सध्याच्या आर्थिक वर्षात प्रधानमंत्री आवास योजनेतून मंजूर झालेल्या १४ लाभार्थ्यांसमोर वन जमिनीचा अडथळा निर्माण झाल्याने लाभार्थ्यांना कुडाच्या, पडक्या, गळक्या झोपडीत रहावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वन जमिनीवरील घरकुलाची अडथळा दूर करण्यासाठी सन २०१२ पासून गावातील नागरिकांनी अनेकदा शासनास लेखी निवेदन देवून वनदावेही सादर केले असतांना प्रधानमंत्री घरकूल आवास योजनेत वन जमिनीचा अडथळा निर्माण होण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मोखावणे-कसारा (ता.शहापूर, जि. ठाणे) ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात मंजूर झालेल्या प्रधानमंत्री आवास योजनेत वन विभागाच्या जागेचा अडथळा दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०३-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) ज्या लाभार्थ्यांची २० ते ३० वर्षापासून वहिवाट आहे. अशा लाभार्थ्यांना यापुर्वी वन विभागाकडून घरकुल बांधकाम

करतांना अडविले जात नव्हते. सद्यस्थितीत दि. १३.१२.२००५ पुर्वी वन जागेत घर असल्याचा पुरावा नागरिकांनी जोडणे आवश्यक असल्याने, ज्या लाभार्थ्यांकडे असा पुरावा नाही अशा लाभार्थ्यांचे वनदावे वन विभागाकडून नाकारण्यात येत आहेत.

(३) व (४) सन २०२१-२२ मध्ये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत एकूण मंजूर २१ लाभार्थ्यांपैकी १८ लाभार्थ्यांना जागा उपलब्ध झाल्याने त्यांना घरकुलासाठी निधी दिलेला आहे. उर्वरित २ लाभार्थ्यांचे जागा मिळण्याकरिता वनदावे वन विभागास सादर करण्यात आलेले आहेत व एका लाभार्थ्याकडे दि. १३.१२.२००५ पुर्वीचा वन जागेत घर असल्याचा पुरावा नसल्याने प्रस्ताव सादर करता येत नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आष्टी व पाटोदा (जि. बीड) तालुक्यात क्रिडा संकूल उभारणेबाबत

**(२५) ६०१८५ (२७-०४-२०२३). श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी व पाटोदा (जि. बीड) तालुक्यातील क्रीडा संकूल मंजूर असून जागेअभावी क्रीडा संकूल उभारण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जागतिक व राष्ट्रीय पातळीवर आष्टी तालुक्यातील खेळाडूंना पदके प्राप्त होऊनही खेळाडूंना पायाभूत सुविधा मार्गदर्शन व प्रशिक्षक मिळत नसल्याने अनेक नवीन शिकाऊ खेळाडूंमध्ये नाराजी निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, क्रीडा संकुलासाठी शासनाकडे जागा उपलब्ध असूनही जागा उपलब्ध करून देण्यास टाळाटाळ होत असून जागेअभावी निधी परत गेला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने शिरूर या नवीन तालुक्याच्या मुख्यालयी क्रीडा संकुलासाठी निधी मंजूर करुन तातडीने क्रीडा संकूल उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (०९-१०-२०२३) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

तालुका क्रीडा संकुल, आष्टी जि. बीड साठी सर्वे नं.४६३ मधील ३.६६ हे. आर शासकीय जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तथापि, सदर जागेबाबत वाद उद्भवल्याने प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

तालुका क्रीडा संकुल, पाटोदा जि. बीड या संकुलासाठी उपलब्ध केलेल्या स. नं. ३२९ मध्ये १.६६ हे. आर जागेवर अतिक्रमण असल्याने तहसिलदार पाटोदा यांच्या मार्फत अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर संकुलाच्या रु. ११०.२६ लक्षच्या अदांजपत्रकास मान्यता देण्यात आली असून रु ६०.०० लक्ष इतका निधी संकुल समितीस वितरीत करण्यात आला आहे.

(४) तालुका क्रीडा संकुल, शिरुर, जि. बीड करिता सर्वे नं.५१ झापेवाडी ता. शिरुर येथील जागा प्राप्त झालेली आहे. संकुलाच्या रु.१३४.५४ लक्ष च्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली असून रु.३५.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. सदर जागेवर वन विभागाने दावा दाखल केल्यामुळे सदर जागेच्या बदल्यात अन्य ठिकाणी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत तहसिलदार शिरुर यांच्याकडे मागणी करण्यात आली आहे. क्रीडा विभागाकडे जागा हस्तांतरीत झाल्यावर संकुल उभारण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भभत नाही.

---

## राजुरा (जि.चंद्रपूर) येथील प्रधानमंत्री आवास योजनेतील खामोना ग्रामपंचायतीच्या गरजूंना प्राधान्यक्रम म्हणून शेवटचे स्थान दिल्याबाबत

**(२६) ६१२०१ (०२-०५-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुरा (जि.चंद्रपूर) येथील खामोना ग्रामपंचायतीने खामोना व माथरा गावातील २२४ लाभार्थ्यांची निवड प्रधानमंत्री आवास योजनेसाठी केली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामपंचायत प्रशासनाने लाभार्थ्यांची निवड ही ग्रामसभेतून केली नसल्याचा तसेच गरजू लाभार्थ्यांना प्राधान्यक्रम म्हणून शेवटचे स्थान दिल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाच्या चौकशीसाठी तीन सदस्यीय चौकशी समिती गठीत केली, परंतू सदरील समिती ही वेळकाढूपणा करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२७-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही. चौकशी पूर्ण झालेली आहे.

(४) ३ विधवा व १ अपंग यांना प्राधान्याने वरचा क्रमांक न देता ग्रामसभेने खालचा प्राधान्यक्रम देण्यात आल्याचे दिसून आले. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत प्राधान्यक्रम ठरविण्याचे अधिकार ग्रामसभेला असल्याने सदर प्राधान्यक्रम यादी कायम करण्यात आली व त्या प्रमाणे लाभ देण्याची प्रक्रिया सुरु आहे. यासाठी संबंधित ग्रामपंचायतीचे सचिव यांना ताकीद देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोसंबी (ता.ब्रम्हपूरी, जि.चंद्रपूर) या गावात शिक्षकांच्या विरोधात शालेय विद्यार्थ्यांनी आंदोलन करून रोष व्यक्त केल्याबाबत

**(२७) ६१४२१ (०२-०५-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोसंबी (ता.ब्रम्हपूरी, जि.चंद्रपूर) या गावात जिल्हा परिषदेची इयत्ता पहिली ते आठवी पर्यतचे वर्ग असून दोन महिला शिक्षक व तीन पुरूष शिक्षक कार्यरत आहेत. मात्र मागील काही महिन्यापासून शाळेतील शिक्षक वेळेवर न येणे, शाळेत येऊन सुध्दा विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी चालढकल करणे, भेदभाव करून विद्यार्थ्यानां शिकविण्यात येणे, यासर्व प्रकारामूळे विद्यार्थी त्रस्त झाले असून या सर्व विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या विरोधात दिनांक ३१ जानेवारी २०२३ रोजी वा त्यासुमारास गावात गावफेरी काढून आंदोलन केल्याची बाब माहे १ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गंभीर प्रकरणाची तक्रार करून सुध्दा प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यामुळे शालेय विद्यार्थ्यांनी आंदोलन करून प्रशासनाचे लक्ष वेधले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी करून संबधितावर कोणती कार्यवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) दि.०१.०२.२०२३ रोजी गटशिक्षणाधिकारी व दि.०२.०२.२०२३ रोजी संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, ब्रह्मपुरी यांनी प्रत्यक्ष भेट देऊन चौकशी केली असता समाजमाध्यमावर प्रसारीत वृत्त अतिरंजीत व बनाव तयार केल्याचे आढळून आले. त्यामुळे शाळेतील शिक्षक यांना अशा प्रकारचे तक्रारी भविष्यात होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत ताकीद देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील जिल्हा परिषद शाळेतील "जिल्हा शिक्षक पुरस्कार" प्राप्त शिक्षकांना मिळणारी अतिरिक्त वेतनवाढ बंद करण्यात आल्याबाबत**

**(२८) ६२२०५ (०२-०५-२०२३). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांना "जिल्हा शिक्षक पुरस्कार" ही योजना जिल्हास्तरावरुन राबवली जात असून पुरस्कार प्राप्त शिक्षकांना अतिरिक्त एक वेतनवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयानुसार दिनांक ०४/०९/२०१८ नंतर अद्यापही जिल्हा स्तरावर पुरस्कार प्राप्त शिक्षकांना ही अतिरिक्त वेतनवाढ मिळणे बंद झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर आगाऊ वेतनवाढ पूर्ववत सुरु करण्याची मागणी जिल्हापुरस्कार प्राप्त शिक्षक समन्वय राज्य संघटनेने शासनाकडे वारंवार केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने दिनांक ०४/०९/२०१८ पासून आजपर्यंतच्या "जिल्हा शिक्षक पुरस्कार" प्राप्त शिक्षकांना सदर अतिरिक्त वेतनवाढ देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०९-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे अंशत: खरे आहे.
(४) शासन परिपत्रक दि.०४.०९.२०१८ अन्वये जिल्हा पुरस्कार प्राप्त शिक्षकांना अतिरिक्त वेतनवाढ देण्याची तरतूद मूळ शासन परिपत्रक दि.१२.१२.२००० मधून वगळण्यात आली आहे. मा.मंत्री (ग्रामविकास) यांच्या अध्यक्षतेखाली शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या समवेत दि.१५.०६.२०२३ रोजी बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार सन २००० ते २०१८ पर्यंत जिल्हा पुरस्कार प्राप्त शिक्षकांना आगावू वेतनवाढ लाभ देण्याकरिता आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामीण भागातील लाभार्थी जागेअभावी शासकीय घरकुल योजनेपासून वंचित असल्याबाबत**

**(२९) ६२६०९ (०२-०५-२०२३). श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामीण भागातील कुटुंबांना वाढत्या लोकसंख्येबरोबरच गावठाणात जागेचा अभाव, गुंठेवारी बंद असल्याने खरेदी विक्री नसणे, गायरान जागेसाठी मंजुरी न मिळणे आदी कारणांमुळे मालकीची जागा नसल्याने लाभार्थी म्हणून पात्र असतानाही शासकीय घरकुल योजनांपासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपनिर्दिष्ट विविध कारणे तसेच कबाला जागेची नोंद ग्रामपंचायतीच्या नमुना क्र. ८ ला नसणे आदींमुळे

घरकुल योजनांचा लाभ घेता येत नसल्याने शासनाचे घरकुल बांधणीचे उद्दिष्ट आणि प्रत्यक्षात घरकुलांची निर्मिती यात मोठी तफावत निर्माण होऊन बेघरांचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाची गावठाण विस्तार (झोपडपट्टी वाटप) सारखी योजना बंद असून पंडित दिनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजना लाभार्थ्यांकडे नोंदणीकृत दस्ताऐवजाद्वारे जागा खरेदी न करता आल्याने त्यांना घरकुल योजनांपासून वंचित रहावे लागत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, घरकुल योजनेसाठी पात्र असून केवळ जागा नसल्याने शासकीय घरकुल योजनांपासून वंचित असलेल्या कुटुंबांना तातडीने जागा उपलब्ध करण्याच्यादृष्टीने शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०३-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत सन २०१६-२०१७ ते २०२१-२०२२ या कालावधीत एकूण १४,०४,७९२ इतके उद्दिष्ट प्राप्त असून त्यापैकी १०,८३,९७८ इतकी घरकुले पुर्ण झाली आहेत. तसेच उर्वरीत घरकुलांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

(३) हे खरे नाही.

राज्यात १,२१,७७७ इतके भूमिहीन लाभार्थी असून त्यापैकी ८२,२५५ लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. उर्वरित ३९,५२२ लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया सुरु आहे. पंडीत दिनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेअंतर्गत २०१६-२०१७ पासून आजपावेतो ३,४४० इतक्या लाभार्थ्यांना अर्थसहाय्य देण्यात आले आहे. तसेच २०,२२१ इतक्या लाभार्थ्यांना विनामुल्य शासकीय जमीन उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(४) भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यासाठी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

१. पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेअंतर्गत ५०० चौ.फु. पर्यंत जागा खरेदी करण्यासाठी रु.५०,०००/- पर्यंत अर्थसहाय्य देणे.

२. दि.०१.०१.२०११ पूर्वीची निवासी जागेवरील अतिक्रमण नियमानुकूल करणे.

३. शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करुन देणे.

४. इतर मार्गाने (भाडेपट्टा, बक्षिसपत्र इत्यादि) जागा उपलब्ध करुन देणे.

५. तसेच पात्र परंतू भूमिहीन लाभार्थ्यांना जागा खरेदी करतांना मुद्रांक शुल्क रक्कम रु. १००० आकारणे, मोजणी शुल्कामध्ये ५० टक्के सवलत, ५०० चौ. फु. जागा खरेदी करतांना तुकडे बंदी कायद्यातील अट शिथील करणे, महसूल विभागाव्यतिरिक्त इतर विभागांच्या जागेवरील अतिक्रमणे नियमित करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देणे व G+२ ऐवजी G+४ इमारत बांधण्यास परवानगी देणे इत्यादी.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे वरसगांव (ता.वेल्हे, जि.पुणे ) येथे ग्रामपंचायत कार्यालय बांधण्याबाबत

**(३०) ६३७३८ (०२-०५-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वरसगांव (ता.वेल्हे जि.पुणे) हे धरणांतर्गत असलेल्या देशमुखवाडी व गोरडवाडी या दोन वाडयांमध्ये विभागले असून या ठिकाणी ग्रामपंचायत कार्यालय नसल्यामुळे नागरीकांना कामे करण्यास अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ग्रामपंचायतीसाठी जागा उपलब्ध असतानाही जिल्हा परिषदेने ग्रामपंचायत कार्यालयासाठी रु. १५ लाखांचा निधी मंजूर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तदनुसार उक्त ठिकाणी ग्रामपंचायत कार्यालय बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-१०-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे,
(३) मौजे वरसगाव (ता. वेल्हे, जि. पुणे) येथील नवीन ग्रामपंचायत कार्यालयाचे बांधकाम जिल्हा वार्षिक योजनेमधून मंजूर झाले असून प्रस्तुत ग्रामपंचायत इमारत बांधकामास निर्विवाद जागा उपलब्ध नसल्याने पुढील कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्हातील घरकुल योजनेतील लाभार्थ्यांचे अनुदान वाढवून मिळणेबाबत

**(३१) ६३७४० (०३-०५-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंडीत दिनदयाळ घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना ५०० चौ.फूट जागा खरेदीसाठी ५० हजार रुपये अनुदान केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनेतून देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे जिल्हयातील जमिनींचे भाव विचारात घेता ५० हजार रुपयांचे अनुदान मिळूनही लाभार्थ्यांना घरकूल योजनेचा लाभ घेता येत नसल्याने पुणे जिल्हा परिषदेकडून अनुदान वाढवून देण्याबाबत राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्रुषंगाने उक्त प्रस्तावाला मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (११-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनेतंर्गत घरकुल पात्र पंरतू भूमिहिन लाभार्थ्यांसाठी पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत अनुदान वाढीचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हरघर जल संकल्पनेनुसार प्रती माणसी ५५ लि. पाणी देण्याचे उद्दिष्ट साद्य करण्याबाबत

**(३२) ६४८६१ (२३-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हर घर जल संकल्पनेनुसार प्रती व्यक्ती ५५ लि. पाणी देण्याचे उद्दिष्ट साद्य करण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील नऊ दुष्काळग्रस्त गावांमधील नळपाणीपुरवठा योजनांचा जलजीवन मिशन कार्यक्रमाच्या आराखड्यात समावेश करून या कामांना मंजुरी देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडे दिनांक २२ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत देवगाव (ता.निफाड) पाणीपुरवठा योजनेसाठी उद्भव न धरल्यामुळे व्याप्तीमध्ये बदल करून या कामात सुधारणा करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा योजना नाशिक यांचेकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, नाशिक जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंता पदाचा कार्यभार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्याकडे दिल्यामुळे सदर कार्यभार ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडील इतर अधिकाऱ्याकडे देण्याची लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू पकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१७-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

याबाबत संबंधित उप अभियंता व प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी प्रत्यक्ष पहाणी करून दिनांक ११.०४.२०२३ रोजी अहवाल सादर केलेला आहे.
(३) हे खरे आहे.

जिल्हा परिषदेमार्फत कार्यकारी अभियंता, उप कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांचे रिक्त पदे भरणेबाबतचा पत्रव्यवहार सुरु आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जालना जिल्हा परिषद अंतर्गत सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांचे अनेक प्रलंबित प्रश्न सोडविण्याबाबत

**(३३) ६४०१६ (०२-०५-२०२३). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्हा परिषद अंतर्गत सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न प्रलंबित असल्याने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी दिनांक ६ फेब्रुवारी. २०२३ रोजी वा त्यासुमारास आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाणीपुरवठा विभागातील तीन ते चार वर्षापासून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवा उपदान व अंश राशीकरण गट विमा आणि आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अद्याप देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,सदर सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे सर्व प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०६-१०-२०२३) :** (१) व (२) होय.
(३) जिल्हा परिषद आस्थापनेवर शासन सूचनेनुसार निर्मित हातपंप/वीजपंप देखभाल दुरूस्ती करीता पदावरील कर्मचारी व देखभाल दुरूस्तीकरीता जिल्हा परिषद स्तरावर निर्मित कर्मचा-यांच्या वेतन व भत्यांचे दायित्व हे जिल्हा परिषदेचेच असून हातपंप/वीजपंप वर्गणी, पाणीपट्टी वसुली व जिल्हा परिषदेच्या उत्पन्नातून भागविणे आवश्यक असल्याचे जिल्हा परिषदेस सूचित केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**करंजाडे (ता.पनवेल, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील आरोग्य केंद्र तातडीने सुरू करण्याबाबत**

**(३४) ६५२५० (२५-०८-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करंजाडे (ता.पनवेल, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील सेक्टर आर २ मधील भूखंड क्रमांक १३४ वर सिडको प्रशासनाने उभारलेल्या इमारतीतील आरोग्य केंद्र अद्यापही सुरू केले नसल्यामुळे सामान्य नागरिकांना आरोग्य सेवा मिळण्यास अनेक अडचणी निर्माण होत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोनाच्या काळात उक्त आरोग्य केंद्रातून नागरिकांना आरोग्य सुविधा पुरविण्यात आल्या असून कोरोना काळानंतर आरोग्य केंद्र बंद असल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यासाठी लाखो रूपये खर्च करून उभारलेल्या इमारतीतील आरोग्य केंद्राची दुरावस्था झाली आहे, हे ही खरी आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून करंजाडे ग्रामपंचायत हद्दीतील सेक्टर आर २ मधील भूखंड क्रमांक १३४ येथे उभारलेल्या इमारतीतील आरोग्य केंद्र तातडीने सुरू करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१०-१०-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

नवी मुंबई क्षेत्रातील प्राथमिक आरोग्य केंद्र गव्हाण अंतर्गत कार्यक्षेत्रात सिडकोकडून करंजाडे येथील इमारतीसह भूखंडाचा आगावू ताबा जिल्हा परिषदेकडे देण्यात आलेला आहे. सदर इमारत हस्तांतरणाची प्रक्रिया सिडको कार्यालयाकडून अंतिम टप्प्यात आहे.

परंतु करंजाडे कार्यक्षेत्राचा उपकेंद्र वडघर अंतर्गत समावेश होतो. आणि सदर इमारतीमधून उपकेंद्र वडघरचे कामकाज सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सन २०११ च्या लोकसंख्येच्या आधारावर बृहत आराखडयामध्ये करंजाडे नोड येथे प्राथमिक आरोग्य केंद्र प्रस्तावित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोकर (जि. नांदेड) तालुका येथील ग्रामीण भागाला पाणी टंचाई निर्माण झाली असल्याबाबत**

**(३५) ६५३२५ (२३-०८-२०२३). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकर तालुका (जि.नांदेड) येथील ग्रामीण भागाला पाणी टंचाईला समोरे जावे लागत असून तालुक्यातील पोमनाळी, पोमनाळा तांडा, जाकापूर तांडा, पांडुरणा, कामणगांव, बोरवाडी, हस्सापूर, जांभळी आदींसह १५ गावांमधून अधिग्रहण मागणीचे प्रस्ताव प्रशासनाकडे प्राप्त झाले असून त्यापैकी पोमनाळा व पांडुरणा येथील प्रस्तावार मंजूरी मिळाल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणीटंचाईवर मात करण्यासाठी विविध भागात साठवण तलावांची कामे सुरु असून नागरिकांना पाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या जलसाठयावर अवलंबून रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त ठिकाणी पाणी टंचाई दूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०६-१०-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

भोकर तालुक्यातील एकूण १४ गावांकरीता १५ विहीर अधिग्रहनाचे प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यापैकी एकूण १४ विहीर अधिग्रहनास मान्यता देण्यात आली आहे.

मौजे कामणगाव येथील प्राप्त २ प्रस्तावापैकी पाणी टंचाई लक्षात घेता आवश्यकतेनुसार १ प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे.

(२) भोकर तालुक्यात मौ.पाकी साठवण तलाव व मौ. दिवशी ल.पा. तलाव या योजनांना महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त असून कामांचे कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे. सद्यस्थितीत या योजनांची भुसंपादन प्रक्रिया प्रगतीत आहे. सदर योजना पूर्ण झाल्यानंतर ४.५८ दलघमी पाणीसाठा निर्माण होईल व एकूण ५४६ हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण होईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील धर्मांतरीत बौध्दांना त्यांच्या पाल्यांचे बालवाडी व पहिलीच्या वर्गात नाव दाखल करतांना धर्मांची व जातीची नोंद करण्याची सक्ती करण्यात आल्याबाबत**

**(३६) ६५७७१ (२५-०८-२०२३). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील धर्मांतरीत बौध्दांना त्यांच्या पाल्यांचे बालवाडी व पहिलीच्या वर्गात नाव दाखल करतांना धर्मांची व जातीची नोंद करण्याच्या सूचना, ग्रामविकास विभागाने सर्व शासकीय अनुदानित व विनाअनुदानित शाळांना दिनांक १७ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामविकासाचा सदर निर्णय हा प्रामुख्याने, अनुसूचित जातीतील धर्मांतरीत बौध्द पालकांसाठीच असल्याने व शाळेमध्ये पालकांनी त्यांच्या मुलाची जात कोणती लिहावयाची असा प्रश्न निर्माण झाल्याने शाळेच्या दाखल्यावर धर्मांचा, जातीचा उल्लेख करण्याची सक्ती करणे योग्य नसल्याचे पालकांनी शासनाकडे विरोध दर्शविला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१०-१०-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही.

केंद्र शासनाने घटना (अनुसूचीत जाती) आदेश (सुधारणा) कायदा १९९०, दि.०३/०६/१९९० अन्वये घटना (अनुसूचीत जाती) आदेश १९५० मध्ये सुधारणा करुन अनुसूचीत जातीसबंधी घटना आदेश बौध्द धर्मियांनाही लागू करण्यात आले आहेत. त्यानुसार अनुसूचीत जातीची यादी हिंदू, शिख आणि बौध्द धर्मियांनाही लागू झालेली आहे. सबब, अनुसूचित जातीमधून बौध्द धर्मात धर्मांतर केलेल्यांना अनुसूचित जातीचे समजण्याबाबत दि.०८/११/१९९० रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिनांक २२/०१/२०२१ च्या अर्धशासकीय पत्रान्वये दिलेल्या सूचना दिनांक १९/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये या विभागाने सर्व जिल्हा परिषदांच्या निदर्शनास आणलेल्या आहेत. या प्रकरणी ग्राम विकास विभागाने कोणताही वेगळा धोरणात्मक निर्णय घेतलेला नाही.

(२) नाही, हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामपंचायत कार्यालयात चतुर्थ श्रेणीच्या कर्मचाऱ्यांना शासनाने चतुर्थ श्रेणी सुविधा लागू केल्याबाबत

**(३७) ६६२१८ (२३-०८-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.शिरीष चौधरी (रावेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामपंचायत कार्यालयातील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना त्यांच्या वर्ग-४ च्या सुविधा लागू करण्याबाबतची अशी स्थानिक लोकप्रतिनिधींनी व महाराष्ट्र ग्रामपंचायत कर्मचारी संघ, पुणे यांनी दिनांक १९ डिसेंबर, २०२२ व २१ डिसेंबर, २०२२ व ०५ मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान वारंवार निवेदनाद्वारे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये कायम आढळून आले तद्अनुषंगाने वर्ग-४ च्या सुविधा लागू करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१०-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ नुसार ग्रामपंचायत ही स्वायत्त संस्था आहे. सदर अधिनियमातील कलम ६१ अन्वये ग्रामपंचायतीच्या उत्पन्नानुसार कर्मचारी नेमण्याचे, त्यांचे वेतन निश्चित करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीला आहेत. हे कर्मचारी पूर्णत: ग्रामपंचायतीचे कर्मचारी असून शासनाचे किंवा जिल्हा परिषदेचे कर्मचारी नाहीत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाल्हे (ता.पुरंदर, जि.पुणे) परिसरातील वाडया-वस्तींवर तीव्र पाणीटंचाई निर्माण झाल्याबाबत

**(३८) ६६३०३ (२३-०८-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाल्हे (ता.पुरंदर, जि.पुणे) परिसरातील पूर्वेकडील वाडया-वस्त्यांवर मागील काही दिवसांपासून तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली असल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त परिसरातील जलस्तोत्रामधील पाणी पातळी कमी झाल्याने नागरीकांकडून टँकर सुरु करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त परिसरातील पाणीपुरवठयाची सोय त्वरीत सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०६-१०-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) वाल्हे परिसरातील पूर्वेकडील गायकवाडवाडी, अंबाजीचीवाडी व मुकदमवाडी या गावात पाणी टंचाई आढळून

आल्यामुळे टँकर मागणीच्या प्रस्तावास उपविभागीय अधिकारी, दौंड, पुरंदर यांनी मंजुरी देउन दिनांक ०५/०६/२०२३ पासून सदर गावांना नियमित पाणीपुरवठा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील पाणी पुरवठा योजनांनी महावितरणाचे ८८.९९ कोटींची देयके प्रलंबित असल्याबाबत**

**(३९) ६६५२७ (२३-०८-२०२३). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयातील तब्बल १४१० पाणी पुरवठा योजनांनी महावितरणाचे ८८.९९ कोटींची देयके थकविली असल्याची गंभीर बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची थकबाकी त्वरित वसूल करण्याकरिता शासनाकडून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१०-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) गट विकास अधिकारी यांचे मार्फत तालुका स्तरावर कॅम्पचे आयोजन करून पाणीपट्टी कर वसूली करण्यात येत आहे. तसेच ग्रामपंचायत स्तरावर ही पाणीपट्टी वसूली करण्यात येते. सदर वसूलीतूनच ग्रामपंचायत स्तरावरून वीज देयक अदा करण्यात येतात.

---

**पिंपरी येथील गरवारे नायलॉन कंपनीच्या कामगारांच्या थकीत वेतन व कंपनीच्या जागेच्या खरेदी विक्रीतील झालेल्या अनियमिततेबाबत**

**(४०) ६६६५८ (२३-०८-२०२३). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी, पुणे येथील गरवारे कंपनीच्या मालकाने शासनाची परवानगी न घेता कंपनी दिनांक २७ ऑगस्ट, १९९६ ला अचानक बंद केल्याने कंपनीतील कामगारांचे उत्पन्न बंद झाल्यामुळे कामगारांवर कौटुंबिक उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कामगारांना नुकसान भरपाई, सेवा उत्पादन, भविष्य निर्वाह निधी व ग्रॅज्युईटी व कायदेशीर देय रक्कम अद्यापही मिळाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कंपनीच्या संशयास्पदरित्या करण्यात आलेल्या पिंपरी, सारोळा, अहमदनगर येथील जागेच्या खरेदी विक्रतील भ्रष्टाचाराची व मुंबई नरीमन पॉइंट येथील पाच हजार स्क्वेअर फुटाचे असलेले दोन मजले लिक्वीडेटरने ताब्यात न घेतल्याचे संशयास्पद व्यवहार इत्यादी प्रकरणाची चौकशी करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २८.०३.२०२३ रोजी मा. उपमुख्यमंत्री यांना लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गरवारे नायलॉन कंपनीच्या कामगारांची २२ वर्षापासूनची थकीत देणे मिळण्यासाठी राज्यातील बंद पडलेल्या कंपनीच्या तेथील कामगारांची देणे कायदेशीर देणी पूर्णपणे अदा केली जात नाही, तोपर्यंत त्या कंपनीच्या जागेवर कोणत्याही प्रकारचे विकसित (डेव्हलपमेंट) करू नये, या धोरणाची प्रभावी अमलबजावणी करणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली,
(५) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने गरवारे नायलॉन कंपनीच्या पिंपरी, सारोळा, अहमदनगर येथील जागेच्या खरेदी विक्रीची उच्चस्तरीय यंत्रणेमार्फत चौकशीबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१३-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मे.गरवारे नायलॉन्स लि., सर्व्हे नं. ४६९४, पुणे मुंबई रस्ता, पिंपरी, पुणे या आस्थापनेत नॉयलॉन व पॉलिस्टर धाग्याचे उत्पादन केले जात होते. सदर आस्थापनेचे एकूण ४ युनिट असून त्यामधील एकूण कामगार संख्या ही १२७० होती. त्यापैकी पिंपरी युनिट मध्ये ८४० कामगार काम करीत होते.

कंपनीची आर्थिक परिस्थिती डबघाईस आल्यामुळे व्यवस्थापनाने दि.२७/०८/१९९६ पासून पिंपरी युनिट मधील उत्पादन बंद केले. त्यानंतर मे.हँकल केमिकल्स (इं) लि. यांनी सदर आस्थापनेविरूध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या रिट याचिका क्र.५२१/१९९२ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.०५/०९/१९९७ रोजीच्या आदेशान्वये शासकीय समापक (ऑफिशियल लिक्वीडेटर) यांची नियुक्ती केली. तद्नंतर मा.उच्च न्यायालयाने सदर याचिकेमध्ये दि.१८/१२/१९९८ रोजी आदेश पारित करुन कंपनीचा गाशा गुंडाळण्यांचा (winding up) आदेश दिला आहे.

सहा. शासकीय समापक, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडून दि.१५/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या माहितीनुसार, शासकीय समापक, मा.उच्च न्यायालय यांच्याकडे मे.गरवारे नायलॉन लि. कंपनीतील १२६९ कामगारांचे दावे प्राप्त झाले आहेत. मे.गरवारे नायलॉन्स लि. आस्थापनेच्या कामगारांना मा.उच्च न्यायालयाच्या दि.१०/१०/२००५ व दि.१२/१२/२०१४ रोजीच्या आदेशान्वये २०% लाभांश जाहीर केला होता. त्यानुसार शासकीय समापक यांच्याकडून कामगारांना रु.४,७०,७५,४३२/- इतक्या रक्कमचे वाटप करण्यात आलेले आहे.

तसेच, सदर कंपनीच्या चारही युनिटसाठी कंपनी व्यवस्थापनाने उपदान फंडाची स्थापना केली होती व या उपदान फंडाच्या रकमेतून एकूण १२७० कामगार/ कर्मचारी यांना देय उपदान रकमेच्या २०% उपदानाची रक्कम रु.०१,०१,७१,७१७/- कामगारांना अदा करण्यात आलेली आहे.

तसेच शासकीय समापक, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडून सहायक कामगार आयुक्त तथा नियंत्रण प्राधिकारी, उपदान प्रदान अधिनियम, १९७२, पुणे यांचेकडे कामगारांच्या उपदानापोटी रू.४५,२७,३८६/- इतकी रक्कम प्राप्त झाली होती. तद्नंतर १७० कामगारांनी सहायक कामगार आयुक्त तथा नियंत्रण प्राधिकारी, उपदान प्रदान अधिनियम, १९७२, पुणे यांचेकडे उपदान प्रदान अधिनियम, १९७२ अंतर्गत उपदानाच्या वसुलीबाबत दावे दाखल केले होते. त्यापैकी १२० कामगारांच्या अर्जावर दि.१७/०३/२००८ रोजी अंतरिम आदेश पारित करून शासकीय समापक यांनी यापूर्वी आदा केलेली २०% रक्कम वजा करून उर्वरित ८०% उपदानाच्या रक्कमेपोटी रू.४१,२९,३२०/- इतकी रक्कम कामगारांना धनादेशाद्वारे आदा करण्यात आलेली आहे.

सहायक शासकीय समापक, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी त्यांच्या दि.१५/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले आहे की, सद्य:स्थितीत मे.गरवारे नायलॉन्स लि. कंपनीची रू.१२,८४,२३,४६६/- इतकी रक्कम जमा असून शासकीय समापक यांच्याकडून संबंधित कामगारांना व Secured Creditors यांना पुढील लाभांश जाहीर करण्याबाबतचा अहवाल मा.उच्च न्यायालय यांना सादर करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(३) सदर जागेची खरेदी विक्रीची प्रक्रिया मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शासकीय समापक यांच्यामार्फत करण्यात आलेली आहे. त्यामुळे याबाबत शासन स्तरावरून कार्यवाही अपेक्षीत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मेहकर (जि.बुलढाणा) येथील पंचायत समितीचे कर्मचारी गैरहजर असल्याबाबत**

**(४१) ६६६९० (२३-०८-२०२३). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) येथील पंचायत समितीस स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२.५.२०२३ रोजी वा त्या सुमारास भेट दिली असता ८ कर्मचारी यांनी कोणतीही पूर्वसूचना न देता गैरहजर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर गैरहजर कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (११-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी ८ कर्मचारी हे दिनांक २२.०५.२०२३ रोजी पुर्वसुचना न देता गैरहजर असल्यामुळे त्यांना गट विकास अधिकारी पंचायत समिती,मेहकर यांनी कारणे दाखवा नोटिस बजावुन संबंधितांचा खुलासा मागविला आहे.संबंधितांनी खुलासे सादर केलेले असुन सदर खुलासे हे अमान्य करण्यात येऊन संबंधितांची दिनांक २२/०५/२०२३ रोजीची एक दिवसाची विनावेतन रजा करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिगोंणा (ता. यावल जि.जळगाव) येथे मुख्यमंत्री पेयजेल मंजूर योजनेतील जलकुंभाचे काम तातडीने पूर्ण करणेबाबत

**(४२) ६७५७२ (२३-०८-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिगोंणा (ता. यावल, जि.जळगाव) येथे मुख्यमंत्री पेयजेल योजना मंजूर होवून चार वर्षे झाली असतानाही या योजनेतील जलकुंभाचे काम अदयाप अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ग्रामस्थांना योजनेचा लाभ मिळत नसल्याने येथे तीव्र नाराजी व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषेंगाने सदरील जलकुंभाचे काम तातडीने पूर्ण करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०६-१०-२०२३) :** (१), (२) व (३ ) होय, अंशत: खरे आहे, मात्र सद्यस्थितीत अस्तित्वातील जलकुंभामधून गावास पाणी पुरवठा चालु आहे.

सदरील जलकुंभाचे बांधकामाकरिता जागा ग्रामपंचायतीकडून ३/०५/२०२० रोजी झालेल्या ग्रामसभेच्या ठरावान्वये उशीराने उपलब्ध करुन दिल्यामुळे जलकुंभाचे काम सुरु करण्यास उशीर झाला. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेची कामे पूर्ण करण्यासाठी शासनाने ३१ मार्च, २०२३ पर्यंत मुदतवाढ दिलेली होती. त्यानुषंगाने संबंधित कंत्राटदारास काम पूर्ण करणेबाबत वारंवार नोटीस बजावण्यात आलेल्या होत्या. सदरील अपूर्ण कामासाठी संबंधित कंत्राटदाराकडून रक्कम रु. २,२१,०६६/- इतका दंड वसुल करण्यात आलेला आहे. तसेच उर्वरित राहिलेले जलकुंभाचे काम जल जीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनेत प्रस्तावित करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पाल (ता. रावेर, जि. जळगाव) येथील ग्रामविकास अधिकाऱ्याच्या मनमानी कारभाराबाबत

**(४३) ६७५७९ (२५-०८-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाल (ता. रावेर, जि. जळगाव) येथील ग्रामविकास अधिकारी हे मनमानी कारभार करीत असून त्यांच्या मनमानी कामाची नि:पक्ष चौकशी व्हावी, यासाठी येथील ग्रामपंचायत सदस्यात ग्रामस्थांनी रावेर पंचायत समिती समोर धरणे आंदोलन केले असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदर प्रकरणी शासनाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (११-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) ग्रामपंचायत पाल येथील ग्रामविकास अधिकारी यांच्या मनमानी कारभाराबाबत गट विकास अधिकारी पंचायत समिती,रावेर यांच्याकडील पत्रान्वये चौकशी करुन कारवाई करणे बाबत अहवाल उप मुख्य कार्यकारी अधिकारी(ग्रापं), जिल्हा परिषद,जळगाव यांच्या कार्यालयाकडे सादर करण्यात आलेले आहे. प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने उप मुख्य कार्यकारी अधिकारी(ग्रापं),जिल्हा परिषद,जळगाव यांच्याकडील पत्रान्वये दोषारोपत्र सादर करणे बाबत गट विकास अधिकारी पंचायत समिती रावेर यांना अवगत करण्यात आलेले आहे.

(३ ) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाडयात मागील वर्षीच्या टंचाई उपाययोजनेचा ३१ कोटी रुपये निधी मागणीचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(४४) ६७६५९ (२३-०८-२०२३). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयात मागील वर्षीच्या टंचाई उपाययोजनेस ३१ कोटी रुपये निधी मागणीचा प्रस्ताव आयुक्त कार्यालयाकडे तसचे शासनाकडे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी शासनाने आयुक्तांना दिलेला आहे काय तसेच निधी केव्हा पर्यंत मिळेल,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त निधी मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०६-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दि.२४.०३.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही,

(४) प्रश्न उद्भवत नाही,

---

**पिंपरी-चिंचवड शहरातील कामगारांना कामगार कल्याणकारी योजनेचा लाभ मिळणेबाबत**

**(४५) ६७६९६ (२३-०८-२०२३). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड शहरात महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे संभाजीनगर, उद्योगनगर आणि संत तुकाराम नगर अशा तीन ठिकाणी कामगार कल्याण केंद्र कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामगारांच्या पाल्यासाठी सर्वसाधारण शिष्यवृत्ती, प्रदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, क्रीडा शिष्यवृत्ती, पाठ्यपुस्तकांच्या अर्थसहाय्य, एम.एस.सी.आय.टी. अर्थसाह्य, गुणवंत विद्यार्थी गौरव, साहित्य प्रकाशन अनुदान, शिवण मशीन अनुदान योजना, गंभीर आजार उपचार अर्थसहाय्य, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना या प्रमुख योजनासह अन्य विविध योजना राबविण्यात येतात हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त नियमित कंत्राटी कुशल अर्ध कुशल व कुशल कामगार कर्मचारी यांना मंडळाच्या कल्याणकारी योजनेचा लाभ हा योजनेची माहिती उपलब्ध नसल्याकारणाने मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर कामगारांना विविध कल्याणकारी योजनेचा लाभ लाभार्थींपर्यंत पोहोचण्याकरिता शासन आपल्या दारी या उपक्रम मतदारसंघात राबविण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (०६-१०-२०२३) :** (१) व (२) होय.
(३) हे खरे नाही.

सन २०२२-२३ मध्ये सदर परिसरातील ११३४ कामगार/कामगार कुटुंबियांनी मंडळाच्या विविध योजना/उपक्रम व कार्यक्रमांचा लाभ घेतलेला आहे.

(४) महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या विविध योजना, उपक्रम व कार्यक्रमांची माहिती कामगार तसेच त्यांचे कुटुंबियापर्यंत पोहचविण्यासाठी मंडळाकडून प्रचार व प्रसार मोहिम नियमितपणे राबविण्यात येते. तसेच मंडळाच्या आर्थिक लाभाच्या योजनांचा लाभ ऑनलाईन प्राप्त करुन घेण्यासाठी मंडळाच्या पोर्टलवर सुविधा उपलब्ध आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिप्परसोगा - कातपूर - लातूर (ता.औसा, जि.लातूर) रस्त्याची सुधारणा व दुरुस्ती करण्याबाबत

**(४६) ६८२०६ (२५-०८-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे हिप्परसोगा (ता. औसा, जि.लातूर) या गावातील नागरिकांना दैनदिन बाजारपेठ लातूर असून सदरील गावातील नागरिकांना दळणवळणासाठी अत्यंत महत्वाचा व वर्दळीचा असलेला हिप्परसोगा - कातपूर - लातूर हा रस्ता अत्यंत खराब झाल्याने वाहतुकीस गैरसोयीचे होत असल्याने सदरील रस्त्याची दुरुस्ती व सुधारणा करून रस्ता वाहतुकीस योग्य दर्जाचा करण्याबाबत औसा विधानसभा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर यांच्याकडे माहे एप्रिल, २०२३ मध्ये निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील मागणीच्या अनुषंगाने रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत व रस्ता वाहतुकीस योग्य दर्जाचा करून नागरिकांची होत असलेली गैरसोय दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (११-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील प्रमुख जिल्हा मार्ग-५१ – कातपूर – हिप्परसोगा पर्यंत रस्ता हा रस्ते विकास आराखड्यानुसार इतर जिल्हा मार्ग क्र.१५ दर्जाचा असून सदर रस्त्याची एकूण लांबी ६.६० कि.मी. इतकी आहे. सदर रस्त्याच्या सा.क्र.०/०० ते २/५०० मधील लांबी डांबरी पृष्ठभागाची असून सुस्थितीत आहे. उर्वरित लांबी डांबरी पृष्ठभागाची असून दुरुस्ती करणे आवश्यक आहे. यास्तव सदर रस्त्याच्या नादुरुस्त लांबीचे काम जिल्हा परिषदेस रस्ते व पूल दुरुस्ती अंतर्गत विविध योजनेमधून प्राप्त होणाऱ्या निधीमधून घेण्याचे नियोजन करण्याबाबत जिल्हा परिषदेस सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर काम निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांच्या मानधनात वाढ करणेबाबत

**(४७) ७०१२४ (२५-०८-२०२३). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांना गावच्या विकासात्मक कामांकरीता पंचायत समिती, जिल्हा परिषद व अन्य शासकीय कार्यालयात सर्वात जास्त ८०% कामे ही ग्रामपंचायत स्तरावर करण्यात येत असल्याने जास्त लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतीना कामाचा अधिक भार पडत असूनही मानधन व उपस्थिती भत्ता अत्यल्प असल्याने त्यांच्यावर आर्थिक ताण निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामपंचायत स्तरावर गावच्या विकासात्मक कामांना गती मिळावी व गाव संपन्न व्हावा याकरीता सर्वच ग्रामपंचायतीमधील सरपंच, उपसरपंच व सदस्य यांच्या मानधनात वाढ करणेसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१०-१०-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) दि.३० जुलै, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील सरपंचांच्या मानधनात वाढ करुन उपसरंपचानादेखील मानधन अनुज्ञेय करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार ७५% अनुदान शासनाकडून देण्यात येत असून उर्वरित २५% मानधनाची रक्कम संबंधित ग्रामपंचायतीच्या स्वनिधीमधून अदा करण्यात येते. तसेच शासन निर्णय दि.६.९.२०१४ अन्वये ग्रामपंचायत सदस्य बैठक भत्त्यामध्ये वाढ करण्यात आले असून १००% अनुदान शासनाकडून देण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगणा विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील देवळी (गुजर) फाटा ते घोटी रस्ता मागील अनेक वर्षापासून नादुरुस्त असल्याबाबत**

**(४८) ७०२०९ (२५-०८-२०२३). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणा विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील देवळी (गुजर) फाटा ते घोटी रस्ता (ता. नागपूर) ग्रामीण लांबी अंदाजे ३ कि.मी हा मागील अनेक वर्षापासून नादुरूस्त स्थितीत असून कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांना लोकप्रतिनिधी यांना दिनांक १८ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (११-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) देवळी (गुजर) फाटा ते घोटी हा रस्ता योजनाबाह्य स्वरुपाचा असून रस्ते विकास आराखडा सन २००१-२०२१ मध्ये समाविष्ट नाही. सदर योजनाबाह्य रस्त्याची एकूण लांबी ३.०० कि.मी. आहे.
सदर रस्त्याच्या संपूर्ण लांबीचे खडीकरण झाले असून १०० मी. लांबीचे डांबरीकरण झालेले आहे. तसेच रस्त्यावर काही ठिकाणी खड्डे पडले आहेत. सदर रस्ता योजनाबाह्य स्वरुपाचा असल्याने रस्ते व पूल दुरुस्तीच्या योजनांमधून सदर रस्त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यास अडचणी आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेद्वारे सदर रस्त्याचे काम जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४ मध्ये "मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/ पाणंद रस्ते योजना" अंतर्गत प्रस्तावित करण्यात आले असून निधीच्या उपलब्धतेनुसार काम पूर्ण करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कामगार कल्याण मंडळ पुणे विभागात योजनांना निधी मिळत नसल्याबाबत**

**(४९) ७०६२४ (२५-०८-२०२३). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात श्रमिकाच्या कल्याणासाठी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाची स्थापना करण्यात आली असून कल्याण निधी अधिनियमानुसार कामगार, मालक आणि शासन अशी त्रिपक्षीय वर्गणी मंडळाला मिळते या वर्गणीतून कामगार व त्यांच्या कुटुंबासाठी कल्याणकारी योजना राबविल्या जातात मात्र पुणे विभागात जेवढा फंड वसूल केला जातो तेवढा निधीही या योजनांना मिळत नसल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इंजिनिअरिंग आणि मेडिकल सारख्या अभ्यासक्रमांसाठी लाखो रुपये फी असणाऱ्या कामगारांच्या मुलांना महिन्याला केवळ १६७ रुपये शिष्यवृत्ती दिल्याने कामगारांमधून सर्वत्र नाराजी व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या पश्चिम महाराष्ट्रातील कामगारांकडून १३ कोटीचा वेल्फेअर फंड वसूल करूनही केवळ सहा कोटी रुपये खर्च करीत असल्याचे वास्तव यामुळे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कामगाराच्या दहावी व बारावीत ६० टक्क्याहून अधिक गुण मिळवणाऱ्या मुलांना वार्षिक २००० इंजिनिअरिंग अथवा मेडिकलसाठी वार्षिक ५००० रुपयाची शिष्यवृत्ती दिली जाते एकीकडे लाखो रुपयांची फी आणि दुसरीकडे महिन्याला शे- दोनशे रुपयाची शिष्यवृत्ती मिळत असल्याने कामगारांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, पुणे, सांगली, सातारा ,कोल्हापूर आणि सोलापूर या पुणे विभागातील कामगार आणि मालकाकडून जेवढा फंड वसूल केला जातो तेवढा निधीही या योजनांना मिळत नसल्याने कामगारांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदर मंडळाकडून कामगारांच्या मुलांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीत वाढ करण्याची मागणी कामगारांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदनुसार शासनाने कोणती उपाययोजना केली वापरण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (२५-०९-२०२३) :** (१) महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे विविध कार्यक्रम, उपक्रम व योजना राबविण्यासाठी मंडळाच्या ७ क्षेत्रीय विभागांना त्यांचे मागणीनुसार तसेच त्या-त्या लेखाशिर्षाखाली गतवर्षी झालेल्या खर्चाच्या प्रमाणात निधी मंजूर करण्यात येतो.
(२) हे खरे नाही. ६० टक्क्याहून अधिक गुण मिळविणा-या कामगारांच्या पाल्यांना इंजिनिअरिंग व मेडीकल अभ्यासक्रमासाठी वार्षिक रु.५०००/- शिष्यवृत्ती दिली जाते.
(३) महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम, १९५३ मध्ये विभागानिहाय प्राप्त होणारे अशंदान त्याच विभागात खर्च करण्याबाबत कोणतीही तरतुद नाही. तथापि, मंडळाच्या क्षेत्रिय विभागाच्या मागणीनुसार व गतवर्षीच्या खर्चाच्या प्रमाणात आवश्यक निधी मंजूर करण्यात येतो.
(४), (५) व (६) अशा प्रकारचे कोणतेही निवेदन महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळास प्राप्त झालेले नाही.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामपंचायतील कर्मचाऱ्यांचे वेतन मागील तीन महिन्यांपासून थकीत असल्याबाबत

**(५०) ७०७१६ (२५-०८-२०२३). श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यासह राज्यातील २७८४४ ग्रामपंचायतील साधारण ४८२९९ कर्मचाऱ्यांचे वेतन मागील ०३ महिन्यांपासून थकीत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, नगरपरिषद कामगार युनियन यांनी मा. मुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री यांचेकडे ने लेखी निवेदन दिले असल्याचे दिनांक १९ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामपंचायतीचे उत्पन्न भरण्याचे काम माहे. एप्रिल, मे, जून २०२३ असे ०३ महिने इआरपी लोगिंनला ग्रामपंचायतीचे उत्पन्न संथगतीने भरण्याचे काम सुरु असून राज्यातील २५० ते २६० ग्रामपंचायतीनी दिनांक १५/०६/२०२३ अखेर आपले उत्पन्न भरले नसल्याने राज्यातील उर्वरित सर्व कर्मचाऱ्यांचे वेतन प्रलंबित ठेवण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,सदर कर्मचाऱ्यांवर वेतना अभावी उपासमारीची वेळ आल्याने राज्यातील ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांचे वेतन मिळावे म्हणून आंदोलन करणार असल्याचे शासनास कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने राज्यातील ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांचे वेतन त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१०-१०-२०२३) :** (१),(२),(३) व (४) होय, हे खरे आहे.

(५) माहे एप्रिल व मे, २०२३ या दोन महिन्याचे उत्पन्नाची माहिती जिल्ह्यांनी विलंबाने भरल्याने ग्राम पंचायत कर्मचारी यांचे किमान वेतन अदा करण्यासाठी विलंब झाला आहे. तथापि, दि.२०.०६.२०२३ अखेर राज्यातील २६४५४ ग्रामपंचायतींनी उत्पन्नाची माहिती भरल्याने वेतन अदायगी प्रक्रिया सुरु करुन माहे, एप्रिल व मे, २०२३ चे वेतन दिनांक ०४.०७.२०२३ रोजी अदा करण्यात आले आहे. तसेच पुढील माहे जून, २०२३ चे वेतन वेळेवर अदा करण्यात आले आहे.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.